॥ श्री ॥
॥ बाबा ॥

# भूपाळी

उठी उठी बाळकृष्णा
स्वीकारा ही मानसपूजा
कशी घेऊ शरणांगता ॥धृ॥

विचार परडी मस्तकी घेऊनी
अनुभव खराटा हाती धरूनी
देहबुद्धी ती मोडीत काढूनी
नच द्या तीज थारा ॥1॥

वृत्ती मोह भ्रम हे त्यांत
कुतर्क वितर्क अनर्थ येत
मनरंगाने परडी भरीत
टाकुनी द्या विकार ॥2॥

ओझे टाकीता समाधान होई
क्षणभर त्यांचा स्पर्शच होई
स्वस्थची बैसोनी साठवू त्यांना
वारंवार शरणांगता ॥3॥

★★★★★